# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.08.2024** **वार – गुरुवार**

---

**अण्णासाहेब पाटील महामंडळ**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळानं विविध योजनांचा लाभ देऊन 1 लाख उद्योजक तयार करण्याचा संकल्प पूर्ण केला आहे. त्यानिमित्त महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत मुंबईत नुकताच सत्कार करण्यात आला. महामंडळाच्या योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या 1 लाख 14 झाली असून या लाभार्थ्यांना बँकांनी 8320 कोटी रुपयांचं व्यावसायिक कर्ज वितरित केलं आहे; त्यापैकी 832 कोटी रुपयांचा व्याज परतावा महामंडळाच्या वतीने करण्यात आला असल्याचं, महामंडळाचे पुणे जिल्हा व्यवस्थापक सचिन खोजे यांनी आज सांगितलं.

**साखर उद्योग**

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अनेक आव्हानां ना तोंड द्यावं लागतं; त्यावर मात करण्यासाठी साखर उद्योगांनी शेतकऱ्यांमध्ये पर्यावरण पूरक तंत्रज्ञानाचा प्रसार आणि प्रचार करावा असं प्रतिपादन राहुरी च्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांनी आज पुण्यात केलं. साखर आणि संलग्न उद्योगा संदर्भात विद्यापीठ आणि विविध संस्थांनी आयोजित केलेल्या दोन दिवसांच्या परिषदेत ते बोलत होते. राज्याचे साखर आयुक्त डॉ. कुणाल खेमनार यावेळी उपस्थित होते.

**ई-नाम**

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कृषी बाजार; म्हणजेच ई-नाम योजनेच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीची निवड झाली आहे. त्या अनुषंगानं बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आज ई-नाम कार्यप्रणालीचं प्रशिक्षण देण्यासाठी एका कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी शेतकरी, आडते, व्यापारी आणि कर्मचाऱ्यांना ई-नाम कार्यप्रणालीबाबत माहिती देण्यात आली.

**सूर्यघर**

घराच्या छतावर सौर उर्जा प्रकल्प बसवून मोफत वीज मिळवण्यासाठी केंद्र सरकारतर्फे प्रधानमंत्री सूर्यघर योजना राबवण्यात येत आहे. या योजनेने राज्यात शंभर मेगावॅाटचा टप्पा पार केला आहे. आतापर्यंत राज्यातल्या 25 हजार 86 ग्राहकांनी, 101 मेगावॅट क्षमतेची यंत्रणा बसवली आहे; आणि या ग्राहकांना 160 कोटी रूपयांचं अनुदान थेट खात्यावर हस्तांतरित करण्याचं काम सुरू आहे; अशी माहिती महावितरणच्या पुणे शाखेनं दिली आहे.

**खड्डे**

पुण्यात गेल्या काही दिवसात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. हे खड्डे बुजवून रस्ते दुरुस्त करण्यासाठी महापालिका युद्ध पातळीवर प्रयत्न करत आहे. 3 ते 6 ऑगस्ट दरम्यानच्या रात्रींत पुणे महापालिकेने 1518 खड्डे बुजवले आहेत.

**प्रकल्प**

पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट केलेल्या गावांमध्ये पिण्याच्या शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. या 23 गावांपैकी खडकवासला धरणाजवळ असलेल्या आठ गावांसाठी महापालिका 170  एमएलडी क्षमतेचा नवीन जलशुद्धीकरण प्रकल्प उभारणार आहे.

**ढोलताशा**

आगामी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहराच्या विविध भागात सध्या ढोल ताशा पथकांचा जोरदार सराव सुरू आहे. त्यामुळं होणाऱ्या ध्वनी प्रदूषणासंदर्भात त्याचबरोबर परिसरातील आजारी आणि वृद्ध नागरिकांना त्यापासून  होणाऱ्या त्रासाविरोधात स्वयंसेवी संघटनांनी आवाज उठवला आहे. दररोज संध्याकाळी साधारणपणे 5 वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत ढोल ताशा पथकांचा हा सराव सुरू असतो; आणि परिसरातील नागरिकांना त्यांच्या मोठ्या आवाजाचा प्रचंड त्रास सहन करावा लागतो. याशिवाय या पथकातील सदस्यांच्या वाहनांच्या पार्किंगमुळे परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी देखील होते. गणेशोत्सवाच्या तोंडावर दरवर्षी शहरात हा प्रश्न निर्माण होत असून महापालिका आणि पोलीस प्रशासनानं या प्रकरणी लक्ष घालून नागरिकांना कमीत कमी त्रास कसा होईल यादृष्टीनं कार्यवाही करावी अशी मागणी या स्वयंसेवी संस्थांनी केली असल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

**कर्करोग**

पुण्यातील सह्याद्री रुग्णालयात आशिया खंडातील पहिली कर्करोगावरील अत्याधुनिक आणि प्रगत तंत्रज्ञान युक्त रेडिओथेरपी उपचार पद्धती सुरु करण्यात आली आहे. रुग्णालयातील प्रमुख कर्करोग तज्ञ डॉ. संजय हुनुगुंडमठ यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे केल्या

जाणाऱ्या या उपचार पद्धतीचा रुग्णावर कोणताही दुष्परिणाम होत नसून अतिशय अचूक आणि वेदनारहित पद्धतीनं, पारंपरिक रेडिओथेरपीपेक्षा कमी वेळात हे उपचार होत असल्याचा दावा त्यांनी केला. वैद्यकीय परिभाषेत टोमोथेरपी म्हणून ही उपचार पद्धती ओळखली जाते.

**क्रीडा**
पुणे महापालिका आणि जिल्हा क्रीडा परिषदेनं संयुक्तपणे आयोजित केलेल्या शालेय स्तरावरील जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत चौदा वर्षाखालील मुलींच्या गटात मिहीर कौल विजेती ठरली. अलिषा शहानं दुसरं तर चतुर्थी परदेशीनं तिसरं स्थान मिळवलं.

**हवामान**
पुणे शहर आणि परिसरात आज ढगाळ हवामान होतं, हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला. कमाल तापमान 28 तर किमान तापमान 22 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही आकाश अंशतः ढगाळ राहील आणि पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी पडतील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी सहा वाजता विविध भारती पुणे केंद्रावर ताज्या पुणे वृत्तांतमधे. नमस्कार.**